# जनसंपर्क अधिकारी

**मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २६६ - २२** **दिनांक ३०/०८/२०२२**

## खुनासहीत दरोडयाच्या गुन्हयातील पाहीजे आरोपीतास १० वर्षानंतर अटक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी.

वालीव पोलीस ठाणे गु.र.नं. १५/२०१२ भा.द.वि.सं.क. ३९६ प्रमाणे दाखल गुन्हयातील मयत इसम नामे मोहम्मद नुरहसर खान, वय. ४५ वर्ष, रा. वरडीया, ता.पालेज, जि.भरुच, राज्य गुजरात, हे दिनांक ०१/०२/२०१२ रोजी त्याचे ताब्यातील ट्रकमध्ये एकुण २५ लाख रुपये किंमतीचा १४ टन ९१० किलोग्रॅम वजनाचे स्टेनलेस स्टीलचे रॉड घेऊन जात असताना आरोपीतांनी आपसात संगणमत करुन मयत याचे ताब्यातील ट्रकमध्ये भरलेला लोखंडी स्टील रॉड चोरी करण्याच्या उद्देशाने आरोपीतांनी तवेरा गाडीचा वापर करुन सदरचा ट्रक अडवुन इसम नामे मोहम्मद नुरहसर खान यास खाली उतरवुन त्याचे हात पाय रसीने बांधुन तवेरा गाडीत बसवुन त्यास ठोस्य-बुक्याने, लाकडी दांडक्याने डोक्यावर, चेह-यावर, हाता-पायावर गंभीर दुखापती करुन त्यास जिवेठार मारुन गवराईपाडा महेंद्रनगर येथील निर्जनस्थळी आणुन त्याचे प्रेत टाकून दिले. तसेच मयत याचे ताब्यातील ट्रकमधील लोखंडी स्टील रॉड हा माल खुनासह दरोडा घालुन चोरी करुन नेला म्हणुन आरोपीतांविरुध्द वालीव पोलीस ठाणे येथे वरिलप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्हयातील पाहीजे आरोपी कालीया ऊर्फ साबीर अली वली मोहमद शहा याचा शोध घेऊनही तो गेल्या १० वर्षापासुन मिळुन येत नव्हता. त्या अनुषंगाने वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेतील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक व गुप्त बातमिदारामार्फत माहिती घेवुन सापळा रचुन कालीया ऊर्फ साबीर अली वली मोहमद शहा, वय ४६ वर्षे रा. रुम नं ०४, गोविंदचाळ, शांतीनगर, नवजीवन, नालासोपारा (पुर्व) ता. वसई जि.पालघर मुळ रा. श्रीगंज, ता. उत्तोरोला जि. बलरामपुर यास दिनांक २९/८/२०२२ रोजी ताब्यात घेवुन त्याचेकडे वर नमुद गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली असता त्याचा सदर गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने नमुद आरोपीतास पुढील कारवाई करीता वालीव पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिले आहे

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय), अति. कार्यभार (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.नि. श्री. राहुल राख, स.पो.नि. दत्तात्रय सरक, पो.हवा. शिवा पाटील, गोविंद केंद्रे, पो.ना. राजाराम काळे ,संग्राम गायकवाड, पो.अं. महेश वेल्हे यांनी केलेली आहे.




**---------000----------**